# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक २१५ वा शनिवार दि.१५ फेब्रुवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# ई केवायसी नसल्याने निराधार महिलांचे अनुदान बंद होणार?



मुंबई : केंद्र आणि राज्य सरकारकडून विविध योजना जनतेसाठी राबवल्या जातात. यासाठी फक्त आधार कार्ड वापरले जाते. तर योजनेचा लाभ घेण्यासाठी फक्त ई केवायसीची अट सरकारची असते. पण आता ही अट पूर्ण न करणा-या हजारो महिलांच्या अनुदानाला कात्री लागणार आहे. संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थी महिलांनी आपले आधार कार्ड, बँक खाते आणि मोबाईल नंबरशी लिंक न केल्याने त्यांचे अनुदान बंद होणार आहे.

केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांच्या लाभासाठी आधार कार्ड हे बँक खाते आणि मोबाईल नंबरला लिंक करणे सक्तीचे आहे. तसाच नियम संजय गांधी निराधार योजनेचा लाभ घेण्यासाठी असून आधार कार्डला बँक खाते आणि मोबाईल नंबर लिंक करणे गरजेचे आहे. तर केवायसी पूर्ण केली नसल्याने राज्यातील हजारो महिलांना याचा फटका बसण्याची शक्यता आहे. दरम्यान राज्यात ९० टक्के लाभार्थी महिलांनी केवायसी पूर्ण केलेली आहे. पण ज्या महिलांनी केवायसी पूर्ण केलेली नाही, त्यांचे अनुदान बंद होणार आहे. पण अद्याप वेळ गेलेली नसून मार्चपर्यंत ई केवायसी पूर्ण करावी लागणार आहे.

निराधार महिलांना मासिक मदत ही केंद्र सरकार आणि राज्य सरकारकडून देण्यात येते. यासाठी श्रावण बाळ आणि संजय गांधी निराधार योजना सुरू केलेली आहे. पात्र निराधार महिलेला प्रतिमाह ६०० रूपयांची आर्थिक मदत सरकार करते. पण आता याच मदतीसाठी ई-केवायसी बंधनकारक करण्यात आली आहे. मार्चपर्यंत याची मुदत असून ज्या महिलांनी केवायसी केली नाही. त्यांची मदत बंद होणार आहे.

## ग्रामपंचायतचा विरोध झुगारून स्टोन क्रेशरला परवानगी कायमस्वरूपी बंद करा; सरपंचाचे आमरण उपोषण सुरू

लातूर : - शेतकऱ्यासह सर्वसामान्य नागरिकांना त्रासदायक ठरणारे पूजा स्टोन क्रेशर कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी असताना तात्पुरती परवानगी देऊन क्रेशर चालू ठेवले. सदरील स्टोन क्रेशर कायमस्वरूपी बंद करण्यात यावे या मागणीसाठी रेणापूर तालुक्यातील मौजे यशवंतवाडी येथील सरपंच ओम चव्हाण यांनी गेल्या ११ फेब्रुवारी २०२५ पासून जिल्हाधिकारी कार्यालय समोर आमरण उपोषण सुरू केले आहे. उपोषणाचा शुक्रवार चौथा दिवस आहे.




रेणापूर तालुक्यातील मौजे यशवंतवाडी गावालगत पूजा स्टोन प्रेशर गेली पाच - सात वर्षापासून सुरू असून या क्रेशरमुळे परिसरातील शेतकऱ्यासह यशवंतवाडीच्या नागरिकांना त्रासदायक ठरत असल्याने यशवंतवाडीच्या ग्रामपंचायतीने ग्रामसभेचा ठराव घेऊन सदरील क्रशर कायमस्वरूपी बंद करून स्थलांतरित करावे अशी मागणी केली असता रेणापूर तहसीलच्या मंडल अधिकाऱ्यांनी याबाबत चौकशी करून वरिष्ठांना सविस्तर अहवाल सादर दिला आहे. दरम्यान क्रशर बंद करण्यात आले होते मात्र पुन्हा तात्पुरती परवानगी दिल्याने क्रशर आज मितीस सुरूच आहे.

या क्रशर मधून मोठ्या प्रमाणात निघणाऱ्या धुळीचा त्रास होत असून या धुळीमुळे परिसरातील शेती पिकाच्या उत्पन्नावर परिणाम होत आहे. स्टोन क्रेशरच्या ब्लास्टिंगमुळे यशवंतवाडी गावातील अनेक कच्च्या घरांना लहान मोठ्या भेगा पडल्या, शौचालयाच्या टाक्या शोषखड्डे ब्लॉक होत आहेत. सार्वजनिक पाणीपुरवठा करणाऱ्या टाकीला तडे गेले त्यामुळे पाण्याच्या टाकीची गळती सुरू झाली. ब्लास्टिंगच्या आवाजाने वन्यप्राणी भयभयीत होऊन शेती पिकाची नासधुस करीत आहेत. सार्वजनिक विहिरीतील पाणी उन्हाळ्यात वाटत असल्याने दरवर्षी पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. बालक, वृद्धासह गरोदर मातांना ब्लास्टिंगच्या आवाजाचा त्रास होत आहे.

पूजा स्टोन क्रेशर कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी असताना शासनाने तात्पुरती परवानगी देऊन स्टोन क्रशर चालू ठेवल्याने ग्रामस्थातून तीव्र असंतोष व्यक्त होत आहे. सदरील स्टोन क्रशर तात्काळ बंद करण्यात यावे आणि नागरिकांना दिलासा द्यावा या मागणीसाठी यशवंतवाडीचे सरपंच ओम शंकरराव चव्हाण यांनी गेल्या ११ फेब्रुवारी २०२५ पासून लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. सरपंच चव्हाण यांच्या उपोषणाचा आजचा चौथा दिवस असून दररोज ग्रामस्थांबरोबरच आजूबाजूच्या परिसरातील सरपंच व इतर लोकप्रतिनिधी उपोषण स्थळाला भेटी देऊन समर्थन देत आहेत.

# लातूरच्या विमान सेवेला मुख्यमंत्र्यांचा ' ग्रीन सिग्नल '

## लातूरच्या विमानतळावरुन लवकरच नियमितपणे हवाई वाहतूक सुरु होणार : प्रेरणाताई होनराव

लातूर : लातूरच्या विमान सेवेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ' ग्रीन सिग्नल ' दिला असून लातूरच्या विमानतळावरून लवकरच नियमितपणे हवाई वाहतूक सुरु होणार असल्याची माहिती भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश प्रवक्त्या प्रेरणाताई होनराव यांनी दिली. लातूरला विमानतळ उपलब्ध आहे. पण त्याचा उपयोग केवळ राजकीय नेत्यांसाठीच केला जातो. लातूरच्या एकंदर विकासाचा आलेख पाहता येथील विमानतळाचा विस्तार, विकास होणे अतिशय गरजेचे आहे, या उद्देशाने आपण राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रत्यक्ष भेट घेऊन लातूरला नियमित विमान सेवा सुरु करण्याची विनंती केली असता क्षणाचाही विलंब न लावता मुख्यमंत्र्यांनी या मागणीला ग्रीन सिग्नल दिल्याचे प्रेरणाताई होनराव यांनी सांगितले. मागच्या दहा वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकाळात देश विकासाच्या दिशेने वेगाने मार्गोत्क्रमण करत आहे. केंद्रीय रस्ते व दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या दूरदृष्टीने देशाच्या कानाकोपऱ्यात महामार्गाचे जाळे विणले गेले आहे. लातूर जिल्ह्यातही महामार्गाचे जाळे मोठ्या प्रमाणात विणले जाऊन त्याचा लाभ नागरीकांकडून घेतला जात आहे. रस्ते आणि रेल्वेच्या मुबलक उपलब्धीत लातूरकरांसाठी आता केवळ नियमित हवाई वाहतूकीची उणीव भासताना दिसतेय. याबाबत आपण



राजकीय, सामाजिक, औद्योगिक, शैक्षणिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांशी चर्चा केली असता, त्या सर्वांकडून लातूरला प्राधान्याने विमानसेवा सुरु होणे गरजेचे असल्याच्या प्रतिक्रिया आल्या. या प्रतिक्रिया ऐकून घेऊन आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत लातूरच्या सर्वांगीण विकासासाठी नियमित हवाई सेवा सुरु करण्याची आग्रही मागणी केली. तेव्हा मुख्यमंत्र्यांनी या मागणीला तात्काळ होकार दिला. लातूरला विमानतळ आहे, पण या ठिकाणी कांही तांत्रिक उणीवाही आहेत. रन वे वाढवण्यासह तांत्रिक उणिवा दूर करण्याच्या अनुषंगाने त्यांनी तात्काळ वरीष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांना सूचनाही दिल्या आहेत. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एमआयडीसीचे कार्यकारी संचालक - मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना या कामाबाबत आवश्यक त्या सूचनाही दिल्या. विमानतळ नियमितपणे सुरु करण्यासाठी लागणारा संपूर्ण खर्च देण्याची तयारीही मुख्यमंत्र्यांनी दर्शविली आहे. मुख्यमंत्र्यांच्या या ग्रीन सिग्नलमुळे लातूर विमानतळावरुन लवकरच नियमित विमानसेवा सुरु होणार आहे. नियमित विमान सुरु करण्यासाठी आपण स्वतः व्यक्तिशः लक्ष घालून पाठपुरावा करणार असल्याचे सांगून प्रेरणाताई होनराव यांनी तमाम लातूरवासियांच्या वतीने मुख्यमंत्र्यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने आठवडी बाजाराचे ठिकाणे निश्चित शहरातील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा - आयुक्त बाबासाहेब मनोहरे

लातूर/प्रतिनिधी :- शहरातील नागरिकांना आठवडी बाजाराच्या दिवशी त्यांना लागणारे भाजीपाला, फळे इ. खरेदी करता यावी यासाठी शहरात ७ ठिकाणी ७ दिवशी आठवडी बाजार भरविण्याचे महानगरपालिका मार्फत नियोजन करण्यात आले आहे.

शहरातील नागरिकांची सोय व्हावी, रहदारीस अडथळा होणार नाही व नागरिकांना आपापल्या परिसरामध्ये भाजीपाला घेण्याची सोय व्हावी याचा विचार करून नागरिकांना आपल्या जवळच्या भागात खालीलप्रमाणे आठवडी बाजाराचे ठिकाण निश्चित करण्यात आले आहे.



सोमवार - अब्दुल कलाम चौक ते सिद्धेश्वर मंदिर जाणारा रोड

मंगळवार व शनिवार - विवेकानंद चौक पाण्याची टाकी परिसर

बुधवार - खाजा नगर ग्रीन बेल्ट खाडगाव रोड

गुरुवार व रविवार कोयना सब स्टेशनच्या बाजूला , सावित्रीबाई फुले उद्यानाच्या समोर

शुक्रवार - पार्थ हॉटेल ते नांदगाव वेस

तरी शहरातील पथविक्रेते, ग्रामीण भागातून आलेले छोटे व्यावसायिक व व्यापारी यांनी महानगरपालिका व वाहतूक पोलीस यंत्रणा यांचेकडून देण्यात आलेल्या नियमाचे व सूचनांचे पालन करावे, तसेच नागरिकांनी वरीलप्रमाणे आपल्या सोयीच्या ठिकाणी नेमून देण्यात आलेल्या दिवशी दिनांक १७/०२/२०२५ वार सोमवार पासून सदर आठवडी बाजारामधून खरेदी करून महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

# तीन साप्ताहिक तर चार पॅसेंजर गाड्या सुरू, १९ वर्षे उलटली तरी गाड्या वाढेनात

किनवट:शेख शौकत :-आदिलाबाद ते मुदखेड-नांदेड हा रेल्वे मार्ग दुर्लक्षित असून, या मार्गावर रेल्वे गाड्या वाढवण्यासाठी व रेल्वे स्टेशनची समस्या सोडवण्यासाठी हिंगोली, आदिलाबाद आणि नांदेडच्या खासदारांनी मोट बांधून लक्ष देण्याची मागणी केली आहे. रेल्वे मार्गाचे रुंदीकरण होऊन १९ वर्षे लोटले तरी सद्यःस्थितीत तीन एक्स्प्रेस, तीन साप्ताहिक आणि चार पॅसेंजर इतक्याच गाड्यांची बोळवण करण्यात आली आहे. देशाच्या मध्यभागी राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूरसाठी नांदेड- मुदखेड किनवट आदिलाबाद मार्गावर एकही नियमित एक्स्प्रेस गाडी नसल्याने या मार्गावरील प्रवाशांची उपेक्षा कायम आहे. नंदिग्राम एक्स्प्रेस नागपूरऐवजी बल्लारशाह येथून मुंबईकरिता धावत आहे. तिचा नागपूरपर्यंत विस्तार करावा, अशी मागणी होती. पण ती बल्लारशाह येथून सोडण्यात येत असल्याने नागपूरच्या मागणीकडे रेल्वे प्रशासनाने दुर्लक्ष केले. आदिलाबाद-मुदखेड नांदेड या मीटरगेज मार्गाचे ब्रॉडगेज करण्यासाठी १९७८ साली स्व. खा. उत्तमराव राठोड यांच्यामुळे मंजुरी मिळाली. मात्र, ब्रॉडगेज होण्यासाठी २८ वर्षे लागली. २००६ काम पूर्ण झाले आणि मार्ग सुरू झाला. ब्रॉडगेज झाल्याने मुंबई,नांदेड, नागपूर व नागपूर नांदेड मुंबई नंदिग्राम एक्स्प्रेस होती.ती आता बल्लारशाह-मुंबई अशी आहे. आदिलाबाद-तिरुपती, तिरुपती आदिलाबाद (कृष्णा एक्स्प्रेस) या दोन गाड्या तसेच तीच गाडी आदिलाबाद-नांदेड इंटरसिटी दोन फेऱ्या करत आहे. पूर्णा-परळी आदिलाबाद, आदिलाबाद पूर्णा परळी ह्या चार पॅसेंजर गाड्या सुरू आहेत. शिवाय पूर्णा-पटणा, धनबाद-दीक्षाभूमी एक्स्प्रेस, संत्रागची या तीन साप्ताहिक गाड्या सुरू आहेत.

### खासदारांची वज्रमूठ महत्त्वाची

नांदेड-मुदखेड-किनवट आदिलाबादमार्गे नागपूर-दिल्लीकरिता एकही गाडी सुरू नाही. नांदेडवरून दिल्लीला गाड्या आहेत. त्या औरंगाबाद-मनमाडमार्गे धावतात. दिल्लीला जायचे झाल्यास किनवट, हिमायतनगर, हदगाव, भोकर, मुदखेड येथील प्रवाशांना नांदेडवरून जावे लागते.

काजीपेठ-ताडोबा एक्स्प्रेस ही साप्ताहिक गाडी बंद आहे. मधल्या काळात सुरू झालेली स्पेशल साप्ताहिक गाडी आता बंद आहे. या गाड्यांव्यतिरिक्त इतर एकही गाडी नव्याने सुरू करण्यात आली नसल्याने हिंगोली व आदिलाबादचे खासदार याकामी कमी पडले आहेत. आता नांदेडचे खासदार रवींद्र चव्हाण यांनी लक्ष घातले आणि तिघांची मोट बांधली गेली तर दमरेवर प्रभाव पडू शकतो आणि गाड्या वाढू शकतात, असे बोलले जात आहे. विद्युतीकरण झाले आता राहिले. दुहेरीकरण नुकतेच राज्याला रेल्वेसाठी २३ हजार ७७८ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. त्यातील नांदेड, मुदखेड, किनवट, आदिलाबाद मार्गासाठी किती, हा प्रश्न अनुत्तरितच आहे.




दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

# प्रेमदिनाचा प्रेमसंदेश

पुन्हा एकदा ऋतूबदलांचे प्रहर आणि मनाची संभ्रमित अवस्था. दिवसा वाहणारे थंड आणि शीतल वारे उन्हाचा तडाखा जाणवू देत नाहीत. याच काळात येतो तो जगभरातील समस्त तरुणाईने लोकप्रिय केलेला व्हॅलेंटाईन डे अर्थात प्रेमदिन! गेल्या काही वर्षांपासून या दिवसाला एक वेगळं आणि अनन्यसाधारण महत्त्व लाभलेलं आहे.

कुणा एका पाश्चात्त्य संताच्या इच्छेनुसार त्याचा जन्मदिवस हा प्रेमदिवस म्हणून जगभरात साजरा करावा, किती रम्य कल्पना! म्हणतात 'इफ यू लव्ह समबडी, लेट देम नो!' मग काय? त्या संताला कदाचित हे माहीत असावं. म्हणूनच त्यांनी आपला जन्मदिवस हा प्रेमदिवस म्हणून साजरा करावा, अशी इच्छा व्यक्त केली. कारण लोक वर्षानुवर्षे प्रेम करतात; पण व्यक्त करत नाहीत. त्यात काय सांगायचं? प्रेम काय शब्दातूनच व्यक्त करावं लागतं? ते तर असतंच असतं. समजावून घ्यावं बस्स! असा सर्वसाधारण नियम पूर्वी होता. आज परिस्थिती बदलली आणि प्रेमाला व्यक्त होण्याची गरज भासू लागली. एका संताच्या दयेनं ठरावीक दिवस म्हणजेच १४ फेब्रुवारी मुक्रर झाला आणि सर्वानुमते गेल्या काही वर्षांपासून हा दिवस साजरा होऊ लागला. अर्थात, जो तो आपापल्या पद्धतीनं अर्थ काढू लागला. क्रमवारीनं त्यात काही चांगल्या तर काही वाईट गोष्टींची भर पडली.

दुर्गाबाईंच्या 'पूर्वा' पुस्तकाचा संदर्भ मनातून जात नाही. 'पूर्वा'तील एक एक कथा, एका एका प्रेममयी वेदनेचं उत्तम उदाहरण आहे. वात्सल्य, प्रेम, प्रणय या भावनात्रयीत एक अस्पष्ट तरल रेषा आहे. इतकी तरल की, या तरल रेषेच्या प्रवासातील टप्प्याटप्प्यावर या कथा आपल्याला नेतात. दुर्गाबाईंचं निसर्गावरील प्रेम, त्यावर मानवी भावभावनांचं रोपण आपल्याला अगदी निसर्गाच्या समीप नेतं. मग, पुन्हा तुकोबाराय आठवतात 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' म्हणत! आपल्याकडील सारीच थोर मंडळी विश्वावर प्रेम करणारी आहेत. तीच शिकवण त्यांनी आपल्या वागण्या-बोलण्यातून, साहित्यातून जनमानसात पोहोचवली आहे. 'मी-तू'पणाचं गळलं बंधन! 'अवघे विश्वची माझे घर' असं असताना या प्रेमाच्या अभिव्यक्तीसाठी खरंच का व्हॅलेटाईन डेचं प्रयोजन लागतं? उत्तर अपेक्षित नाही! कारण, प्रश्नाला प्रतिप्रश्न उठणारच.

आपण आज विराट प्रेमावर आपण बोलू. जरा वेगळं, काहीसं हळवं होऊ. कारण, आज मनात दुर्गाबाईंचा विचार पिंगा घालतोय. त्यांच्यासोबत कुसुमाग्रज पण येऊ लागलेत. त्यांच्या कवितेतून अंतरिक्षातील प्रेमाची प्रचिती येते. त्यांच्या 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेत सूर्य आणि धरेच्या अद्भुत प्रेमकथेचा मिलाफ आहे. अतिशय उत्कट आणि पराकोटीचा समजूतदारपणा याचं हृदयगम्य चित्रण आहे. भास्कराचं प्रेम पृथ्वीवर आहे की नाही, याविषयी संदिग्धता आहे. ती धूसर आहे; पण पृथ्वीचं मात्र त्याच्यावर अतोनात आणि मनस्वी प्रेम आहे. ती त्याच्या कक्षेत युगानुयुगे फिरतेय, याचना करतेय, विनवणी करतेय, आपल्यासाठी किती ग्रह-तारे उत्सुक आहेत, ते भास्कराला सांगतेय; पण ती लाचार नाही, ती चिरविरहिणी आहे. ती त्याला म्हणते, 'अमर्याद मित्रा तुझी थोरवी अन् मला ज्ञात मी एक धूलिकण, परी अलंकारिण्या पाय तुझे , धुळीचेच आहे मला भूषण.' जे आपल्याजवळ आहे ते सच्चे आहे, पवित्र आहे, मनापासूनचे आहे, तेच मी तुला देईन ते तू मनापासून स्वीकार. हृदयाच्या गाभ्यापासून ही माझी इच्छा आहे, आर्जव आहे. मनाची असोशी आहे, तहान आहे; पण लाचारी नाही. तुझी दया नको, भीक नको तर प्रेम हवंय. प्रीती हवीय. नाही मिळाली, तर मी तशीच राहीन. तुझी दूरता परवडेल; पण दुबळ्यांचा श्रृंगार नको! ती त्याला रोज पाहते. दुरूनच का होईना निरखत असते. कारण, ती त्याच्याच कक्षेत फिरते ना? किती उच्च कोटीची ही प्रीत, प्रेम! कोणत्या व्हॅलेटाईन डेला सूर्य तिची ही प्रेमभावना ओळखून तिला 'हॅपी व्हॅलेंटाईन डे' म्हणेल आणि प्रपोज करेल? नाही म्हणणार! कदाचित म्हणेल. सारंच काही संदिग्ध!

काही भावना या कालातीत आहेत. काळ गूढ आहे. अदृश्य आहे; पण पारदर्शी आहे. काळाच्या वाहत्या धारेत काही नवीन बदल होऊ लागले आहेत. त्यातील आनंद आपणही घ्यावा आणि इतरांना द्यावा.

# यात अदानी समुहाचं काय चुकलं?

संत तुकाराम महाराज म्हणतात, जया अंगी मोठेपण तया यातना कठीण. खरंच आहे ते. नाहीतर अदानींसारख्या मोठ्या उद्योजकाविरोधात सतत वादांचं मोहोळ उठवलं गेलं नसतं. हिंडेनबर्ग रिसर्चने एवढा लांबलचक अहवाल सादर केला, पण काय निष्पन्न झालं? कोणतेही आरोप न्यायालयात टिकू शकले नाहीत. धडाधड कोसळेले समभाग तेवढेच झटपट वधारले आणि शेवटी त्या हिंडेनबर्ग रिसर्चलाही कुलूप लागलं. ते वादळ शांत होतं न होतं, तोच द गार्डियन या ब्रिटिश वृत्तपत्राने खळबळजनक बातमी प्रसिद्ध केली. त्या बातमीचा मथितार्थ असा की, अदानींचा सहभाग असलेल्या गुजरातेतल्या एका प्रकल्पामुळे भारताची पाकिस्तानलगतची सीमा असुरक्षित होण्याची शक्यता आहे. पण यात खरंच अदानींची चूक आहे का?

ही बातमी दिली आहे गार्डियनच्या दक्षिण आशियातल्या प्रतिनिधी हाना एलिस पिटरसन आणि मुक्त पत्रकार रवी नायर यांनी. हे वृत्त आणि रवी नायर यांची मुलाखत या आधारे घटनाक्रम समजून घेण्याचा प्रयत्न केला. आधी ज्या भागात हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे, तो भाग संरक्षणाच्यादृष्टीने एवढा महत्त्वाचा का, हे जाणून घेऊया नायर यांच्या म्हणण्यानुसार हा पवन ऊर्जा प्रकल्प सर क्रीकपासून अवघ्या एक किलोमीटर अंतरावर आहे. १९६५च्या युद्धानंतर झालेल्या करारानुसार हा खाडीचा भाग भारताच्या हद्दीत आहे. मात्र पाकिस्तानातल्या अनेकांना आजही असं वाटतं की कच्छ हा सिंध प्रांताचा आणि म्हणून पाकिस्तानचा भाग आहे. १९७१च्या युद्धातही या भागावर पाकिस्तानने आक्रमण केलं होतं. अजमल कसाब आणि त्याचे साथीदार याच वाटेने भारतात आले, असाही दावा करण्यात आला होता.

आता प्रकल्प आणि नियमांत झालेल्या फेरबदलांविषयी २०१९मध्ये गुजरात सरकारने कच्छच्या रणातील ७२ हजार ४०० हेक्टर जागा पवन ऊर्जा प्रकल्पासाठी देण्याचा निर्णय घेतला. गुजरात आणि केंद्र सरकारच्या प्रत्येकी दोन कंपन्या आणि दोन खासगी कंपन्यांचा यात समावेश होता. त्यातली सर्वांत जास्त २३ हजार हेक्टर जमीन सोलार एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडियाला देण्यात आली होती. नियमांनुसार एकाच खासगी कंपनीला २० हजार हेक्टर्सपेक्षा जास्त मोठा भूखंड देता येत नाही. आदानी ग्रीन एनर्जीला १९ हजार ५०० हेक्टर्सचा भूखंड देण्यात आला होता. या करारानुसार संबंधित कंपन्यांना लीजची रक्कम आणि निर्माण होणाऱ्या प्रत्येक मेगावॉटमागे ठराविक रक्कम सरकारला द्यावी लागणार होती. सोलार एनर्जी कॉर्पोरेश ऑफ इंडिया म्हणजेच एसईसीआयने कळवलं की एवढ्या मोठ्या भूखंडावर केवळ पवन ऊर्जा प्रकल्प उभारणं फायदेशीर ठरणार नाही. पवनचक्क्यांच्या बरोबरीने तिथे सोलार पॅनलही लावण्याची परवानगी मिळाली, तरच यात सहभागी होणं परवडेल.

मात्र, संरक्षण नियमांनुसार सीमेपासून १० किलोमीटरपर्यंत फार मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा उभारण्याची परवानगी नाही. सीमेलगतच्या गावांत घरं, शाळा, मंदिरं, दुकानं इत्यादी किरकोळ बांधकामांना परवानगी असते. त्यामुळे गुजरात पॉवर कॉर्पोरेशनने एसईसीआयला कळवलं की हा प्रश्न पंतप्रधान कार्यालयाकडे मांडण्यात येईल. पंतप्रधान कार्यालय संरक्षण मंत्रालयाशी चर्चा करून या संदर्भातला निर्णय घेईल. ८ मे २०२३ रोजी एक नोटिफिकेशन जाहीर करण्यात आलं, त्यानुसार स्थानिक प्राधिकरणाशी चर्चा करून सीमांलगतच्या भागांतील पायाभूत सुविधांच्या उभारणीविषयीचे नियम शिथील केले जाऊ शकतात, असं स्पष्ट करण्यात आलं. साहजिकच हा नियम पाकिस्तानसह चीन, नेपाळ आणि म्यानमार लगतच्या सीमांनाही लागू झाला. पण आश्चर्य म्हणजे हे नोटिफिकेशन एसईसीए वगळता अन्य सर्व संबंधित कंपन्यांपर्यंत पोहोचलं.

गार्डियनच्या बातमीत म्हटल्यानुसार एसईसीआयची मागणी पूर्ण करणारी तरतूद झालेली असूनही तत्कालीन केंद्रीय ऊर्जामंत्री आर. के. सिंग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत एईसीआयला ही जागा परत करण्यास उद्युक्त करण्यात आलं. नोटिफिकेशन निघून तब्बल दोन महिने उलटून गेल्यानंतर एसईसीआयने ही जागा गुजरात सरकारला आर्थिकदृष्ट्या फायदेशीर नसल्याचं सांगत परत केली, मात्र याच्या दोन आठवडे आधीच आपण ही जमीन घेऊ इच्छित असल्याचं अदानी समुहाने गुजरात सरकारला पत्र लिहून कळवलं होतं. सरकारी नियमानुसार एका कंपनीला २० हजार हेक्टरहून अधिक जागा देता येत नाही. पण इथे एका कंपनीने नव्हे, तर अदानी पॉवर आणि मुंद्रा सोलार अशा दोन कंपन्यांच्या नावे अर्ज करण्यात आला. नियम कुठेही मोडला जाणार नाही, याची काळजी अदानींनी घेतली होती. गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल, यांच्या नेतृत्त्वाखालील समितीने अदानी समूहाला तब्बल २५ हजार हेक्टरचा भूखंड दिला. अशारितीने आधीच मिळालेले १९ हजार ५०० हेक्टर आणि नव्याने मिळालेले २५ हजार हेक्टर असा एकूण ४५ हजार ५०० हेक्टर्सचा भूखंड अदानींच्या ताब्यात गेला.

हा सारा घटनाक्रम पाहता सरकारनेच नियम बदलले, त्याची माहिती चुकून एसईसीआयपर्यंत पोहोचली नाही, पण अदानींपर्यंत पोहोचली, यात अदानींचा काय दोष? आता संरक्षण क्षेत्रातून टीका होतेय की सोलार पॅनल्स असतील, तर सुरुंग पेरता येणार नाहीत. रणगाडे कुठून नेणार? त्यावरही सरकारनेच उपाय सुचवला आहे की मधोमध २०० मीटर जागा रस्ता बांधण्यासाठी सोडण्यात यावी. अदानी त्यासाठी तयारही झाले आहेत. त्यांनी संरक्षण क्षेत्राला पूर्ण सहकार्यही केलं आहे. तर त्यावरही काय, तर सरळ मोकळ्या रस्त्यावरून येणाऱ्या रणगाड्यांना लक्ष्य करणं शत्रूला सोपं जाईल. रशियाचे रणगाडे युक्रेनने अशाच प्रकारे निष्प्रभ केले, म्हणे. त्रुटीच काढत बसायचं, तर 'विकास' कसा होणार?

अदानींना त्यांच्या अंगी असलेल्या मोठेपणामुळे 'यातना कठीण'चा सामना करावा लागल्याची ही पहिलीच वेळ नाही. नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असल्यापासूनच त्यांच्या मागे अशा 'यातना' लागल्या असल्याचं दिसतं. २६ एप्रल २०१४च्या बिझनेस स्टँडर्डच्या वृत्तानुसारर मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असताना विविध उद्योग समुहांना आपापल्या प्रकल्पांसाठी जमीन देण्यात आली. अन्य समुहांनना ५०० ते सहा हजार रुपये प्रति चौरस मीटर दराने जमीन मिळाली असताना अदानी समुहाला बंदर विकसित करण्यासाठी अवघ्या ३२ रुपये प्रति चौरस फुट दराने जमीन देण्यात आली. एप्रिल २०१५च्या कॅगच्या अहवालानुसार गुजरात सरकारने २००८-०९च्या दरम्यान वनजमिनीचं वर्गीकरण योग्य प्रकारे न केल्यामुळे अदानींच्या सहभागातून उभारण्यात आलेल्या मुंद्रा बंदर प्रकल्पाला ५८ कोटी रुपयांचा लाभ झाला.

केंद्र सरकारने महाराष्ट्रातल्या गोंदियात ३७० एकर वनजमीन अदानींच्या औष्णिक ऊर्जा प्रकल्पाला दिल्याचं वृत्त द टाइम्स ऑफ इंडियाने २४ ऑक्टोबर २०१४ रोजी म्हणजे नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर अवघ्या पाच महिन्यांत प्रसिद्ध केलं होतं. मार्च २०१८मध्ये अदानी समुहाला एक हजार ५५२ हेक्टर वन जमीन मुंद्रा विशेष आर्थिक क्षेत्रासाठी विकसित करण्याची परवानगी मिळाली.

हसदेवचं अतिशय समृद्ध जंगलही सरकारने स्वतःच अदानींच्या स्वाधीन केलं. तिथल्या स्थानिकांनी जंग जंग पछाडले, रक्त सांडलं, पण काहीही फायदा झाला नाही. झारखंडच्या गोड्डा येथील प्रकल्पालाही स्थानिकांचा तीव्र विरोध आहे. अदानींच्या ऑस्ट्रेलियातल्या खाणींतला कोळसा, त्यांच्याच जहाजांतून, ओरिसातल्या त्यांचंच व्यवस्थापन असलेल्या बंदरावर उतरवला जातो आणि त्यांच्यासाठी बांधलेल्या विशेष रेल्वे मार्गाने गोड्डात आणून जाळला जातो. निर्माण होणारी वीज बांगलादेशात पुरवली जाते आणि प्रदूषणाने घुसमट मात्र गोड्डावासीयांची होते, अशी टीका करणारी वृत्तं प्रसिद्ध झाली आहेत. बांगलादेशातही या महागड्या वीजेवर तत्कालीन विरोधकांनी तीव्र टीका केली होती.

बहुचर्चिच आणि वादग्रस्त ग्रेट निकोबार प्रकल्पातही अदानी समुहाने औपचारिकरित्या स्वारस्य दर्शवल्याची वृत्तं आहेत. बिझनेस स्टँडर्डने ३ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार एकूण ११ कंपन्यांनी या प्रकल्पात स्वारस्य दर्शवलं आहे. या वृत्तात संबंधित कंपन्यांची नावं नाहीत, मात्र अदानी वॉच, मेरिटाइम गेट वे अशा संकेतस्थळांनी अदानींनी यात स्वारस्य दर्शवल्याची वृत्तं दिली आहेत. या बेटांवर अवाढव्य बंदर, विमानतळ आणि व्यापाराच्या दृष्टिकोनातून नगर वसवण्यात येणार आहे. या प्रकल्पाविरोधात पर्यावरण, मानवी हक्क आणि काही प्रमाणात संरक्षण क्षेत्रातूनही आवाज उठवण्यात येत आहे. तिथल्या संवेदनशील पर्यावरणाविषयी चिंता व्यक्त करणारं एक निवेदन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना विविध देशांतल्या पर्यावरण अभ्यासकांनी पाठवलं आहे.

लडाखमधल्या सौर ऊर्जा प्रकल्पाविरोधात सोनम वांगचुक यांनी उभारलेलं आंदोलन बराच काळ चर्चेत होतं. तिथल्या प्रस्तावित अपारंपरिक ऊर्जा प्रकल्पाविरोधात प्रचंड असंतोष आहे. ९ गिगावॉट सौर आणि चार गिगावॉट पवनऊर्जा निर्मिती करून ती ७१३ किमी दूर असलेल्या हरियाणात पोहोचवण्याचा घाट घालण्यात आला आहे. त्यासाठीच्या ट्रान्समिशन लाइन उभारण्याचं काम सरकारी संस्थेला देण्यात आलं असलं, तरी हा प्रकल्प खासगी कंपनी उभारणार की सरकारी, हे अद्याप स्पष्ट करण्यात आलेलं नाही. खासगी कंपनीला दिलं गेलं, तर ती कोणती असेल?

हे केवळ ऊर्जा प्रकल्प आणि खाणींविषयी. इतरही अनेक क्षेत्रांत असंच काहीसं घडलं आहे. त्याची जंत्री आणखी लांबलचक आहे. पण थोडक्यात अदानींनी सर्व नियमांचं पालन करूनच हे सर्व प्रकल्प उभारले आहेत. आता वेळोवेळी झालेले नियमबदल त्यांच्या पथ्यावर पडले, त्याला ते तरी काय करतील?




# पुलवामा : भ्याड आत्मघाती हल्ला !

आज जगभरात १४ फेब्रुवारी हा दिवस 'व्हेलेंटाईन डे' म्हणून साजरा केला जातोय. मात्र सहा वर्षांपासून हाच दिवस देशासाठी आणि भारताच्या जवानांसाठी काळा दिवस ठरला. याच दिवशी जम्मू-काश्मीरमधील पुलवामा येथे दहशतवाद्यांनी दहशतवादी हल्ला करून हा दिवस रक्तरंजित केलाय. भारतातील जम्मू आणि काश्मीरच्या पुलवामा जिल्हयातील जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरील, लेथापोरा या अवंतीपोर जवळ असलेल्या ठिकाणी केंद्रीय रिझर्व्ह पोलीस फोर्सच्या सैनिकांना घेऊन जाणाऱ्या सुरक्षा दलांच्या वाहनांच्या एका ताफ्यावर १४ फेब्रुवारी २०१९ ला दुपारी सुमारे ३.१५ वाजता एका आत्मघाती हल्लेखोराने आपल्या वाहनासकट हल्ला केला. त्या दिवशीही रस्त्यावर सामान्य वाहतूक होती. जम्मूतील चेनानी रामा संक्रमण शिबिरातून जवानांचा ताफा श्रीनगरकडे रवाना झाला होता. पहाटे निघालेल्या सैनिकांना सूर्यास्त होण्यापूर्वी श्रीनगरच्या बक्षी स्टेडियममधील संक्रमण शिबिरात पाहेचायचे होते. ताफा आपल्या मुक्कामावर सूर्यास्तापूर्वी पोचणे अपेक्षित होते. हा प्रवास सुमारे ३२० कि.मी. अंतराचा होता आणि पहाटेपासून सैनिक प्रवास करीत होते. हल्ला झालेल्या ठिकाणापासून श्रीनगरचे अंतर जेमतेम ३३ कि.मी. एवढे होते. हा हल्ला जैशचा बदला मानला जात होता. कारण हल्ल्याच्या दोन दिवस आधीच पुलवामाच्या रत्नीपोरा भागात सुरक्षा दलांनी एका चकमकीत जैशचा एक दहशतवादी मारला होता. पण भारतानेही या हल्ल्याचे जोरदार प्रत्युत्तर दिले होते. या हल्ल्याच्या काहीच दिवसांनी भारतीय लष्करानं पाकिस्तानमध्ये घुसुन बालाकोटमध्ये सर्जिकल स्ट्राईक करुन दहशतवाद्यांचा खात्मा केला होता. त्या दिवशी जैशच्या ठिकाणी हल्ला करुन भारताने ३०० पेक्षा जास्त दहशतवादी ठार केले होते.

आदिल अहमद डार उर्फ आदिल अहमद गादी टेकरनवाला उर्फ वकास कमांडो असे त्या आत्मघाती हल्लेखोराचे नाव होते. या अपघातानंतर त्या हल्लेखोराचा एक व्हिडियोपण प्रसारित करण्यात आला होता. या हल्ल्यात एका महिंद्र स्कॉर्पियो वाहनाचा वापर करण्यात आला होता. या वाहनात सुमारे ३०० किलो स्फोटके भरलेली होती. ताफ्यातील केंद्रीय राखीव बलातील सुमारे ४० सैनिकांचा घटनास्थळीच मृत्यू झाला तर हल्लेखोर देखील मरण पावला. या काफिल्यात सुमारे ७८ वाहने व सुमारे २५०० पेक्षा जास्त सैनिक होते. मात्र पुलवामामध्येच जैशच्या दहशतवाद्यांनी या जवानांना लक्ष्य केले. सैनिकांच्या या ताफ्यातील अनेक सैनिक आपली रजा संपवून कर्तव्यावर परतले होते. जैशला या ताफ्यातील सर्व २५०० सैनिकांना लक्ष्य करायचे होते. हल्ल्यानंतर सीआरपीएफ अधिकाऱ्याने या हल्ल्याची माहिती दिली होती. ताफ्यात सुमारे ७८ बसेस होत्या पण फक्त एका बसवर हल्या झाल्याचे त्यांनी त्यावेळी सांगितले होते. हा ताफा जम्मूहून श्रीनगरला जात होता. धक्कादायक बाब म्हणजे पाकिस्तान स्थित इस्लामिक गट जैश-ए-महंमद या दहशतवादी संघटनेने काश्मीरची वृत्तसंस्था जीएनएसला टेक्स्ट मॅसेज पाठवून या हल्ल्याची जबाबदारी घेतली होती.

पुलवामा येथे शहीद झालेल्या ४० जवानांच्या बसमध्ये महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर येथील कॉन्स्टेबल ठका बेलकर यांचाही समावेश होता. हल्ल्याच्या आधीच काही दिवस त्यांचे लग्न ठरले होते. कुटंबातील मंडळी त्यांच्या लग्नाची तयारी करत होते. बेलकर यांनी रजेसाठी अर्ज केला होता. परंतु त्यांची रजा मंजूर झाली नव्हती. त्यामुळे आपल्या सहकाऱ्यांसोबत तेही या बसमधून निघाले होते. परंतु बस सुटण्याआधी काही वेळ त्यांना मोबाईलवर रजा मंजूर झाल्याचा मेसेज आला आणि ते बसमधून खाली उतरले. त्यानंतर काही वेळातच या बसवर हल्ला झाला. पण काही वेळापूर्वी आलेल्या मेसेजमुळे बेलकर यांचे प्राण वाचले.

पुलवामा हल्ल्याच्या जखमा अजूनही ताज्या आहेत. पुलवामा जिल्ह्यात स्फोटकांनी भरलेल्या गाडीनं सीआरपीएफच्या जवानांच्या बसला धडक दिली. त्यात ४० जवान शहीद झाले. तर अनेकजण गंभीर जखमी झाले. दहशवाद्यांनी केलेल्या या भ्याड हल्ल्यात सीआरपीएफचे ४० जवान शहिद झाले होते. शहिद झालेल्या ४० शहिदांमध्ये सीआरपीएफच्या ७६ व्या बटालियनच्या ५ जवानांचा समावेश होता. स्फोट एवढा जोरदार होती की, काही काळ सर्वत्र धुळीशिवाय काहीच दिसत नव्हते. धुर दूर होताच तेथील भयावह दृश्य पाहून संपूर्ण देश त्या दिवशी रडला हाता. या हल्ल्यात जवानांच्या मृतदेहाचे तुकडे इकडे-तिकडे विखुरले गेले होते आणि घटनास्थळी रक्ताचा सडा पडला होता. या भ्याड हल्ल्यानंतर या घटनेच्या जोरदार प्रतिक्रिया उमटल्या आणि संपूर्ण देशातून संतापजनक व्यक्त करण्यात आला होता. या हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला दिलेला 'मोस्ट फेव्हर्ड नेशन' हा दर्जा काढून घेतला. पुलवामा हल्ल्याला आज सहा वर्षे पूर्ण झाली आहेत आणि देशभरात या शहिदांना श्रद्धांजली वाहिली जात आहे. आजच्या दिनी त्या सर्व शहिद जवानांना भावपूर्ण श्रध्दांजली !

******

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव वाढत असताना अंडी खाणे सुरक्षित आहेत का? वाचा, तज्ज्ञ काय सांगतात

देशभरात बर्ड फ्लूचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्यामुळे किरकोळ विक्रेते आणि रेस्टॉरंट्समध्ये कोंबड्यांची कमतरता निर्माण झाल्याने त्या ठिकाणी कोंबड्यांच्या किमती वाढल्या आहेत. गेल्या आठवड्यात देशातील सर्वांत मोठ्या अंडी उत्पादकांपैकी एकाने सांगितले, त्यांच्या इंडियाना फार्ममधील कोंबड्यांना एव्हीयन इन्फ्लूएंझा झाल्याचे आढळले आहे.

संशोधकांनी यावर भर दिला आहे, बर्ड फ्लूचा धोका अजूनही सामान्य जनतेच्या बाबतीत कमी असला तरी विषाणूचा प्रसार आणि बदल होत राहिला, तर धोका वाढू शकतो. परंतु, दुकानांमध्ये कोंबडी व अंड्यांचे अनेक रिकामे शेल्फ आढळत आहेत. परिणामत: लोकांना बहुतांशी नियमितपणे लागणाऱ्या अंड्यांच्या किमती वाढल्याने ग्राहकांमध्ये अंड्यांचा पुरवठा आणि त्यांच्या सुरक्षिततेबद्दल चिंता निर्माण झाली आहे.

या टप्प्यावर तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, बर्ड फ्लूने संक्रमित अंडे किराणा दुकानात पोहोचण्याची शक्यता कमी आहे. सार्वजनिक नियमांनुसार व्यावसायिकरीत्या पॅक केलेली अंडी धुऊन, निर्जंतुक करून पाठविणे आवश्यक आहे, ज्यामुळे अंड्याच्या कवचाच्या बाहेरील विषाणूचे कण काढून टाकण्यास मदत होते.

विषाणू कोंबड्यांनादेखील वेगाने आजारी करतो. अंडी उत्पादक, आधीपासून संक्रमित पक्ष्यांना मारून टाकतात आणि आणि उर्वरित समूहाला वेगळे करतात. संसर्ग झालेले कोणतेही पक्षी दूषित अंडी तयार करण्यापूर्वीच त्यांच्या आजारांमुळे मरण्याची शक्यता असते.

मृत पक्षी अंडी घालत नाहीत, असे वॉशिंग्टन, डी.सी. येथील पशुवैद्यकीय सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञ व सल्लागार डॉ. गेल हॅन्सन यांनी सांगितले. जेव्हा विषाणू एखाद्या कळपाला प्रभावित करतो तेव्हा त्याची अंडी सामान्यतः अन्न पुरवठ्यातून काढून टाकली जातात.

शास्त्रज्ञ अजूनही हे शोधण्याचा प्रयत्न करीत आहेत की, दूषित पदार्थ खाल्ल्याने किंवा प्यायल्याने मानवाला बर्ड फ्लू होऊ शकतो का? २०२४ पासून अमेरिकेत संक्रमित झालेल्या किमान ६६ लोकांपैकी बहुतेकांना आजारी प्राण्यांच्या संपर्कातून विषाणूची लागण झाली.

तरीही असे दिसते की, विषाणू काही विशिष्ट अन्नांद्वारे प्रसारित होऊ शकतो. विषाणू असलेले कच्चे दूध प्यायल्यानंतर माकडे आजारी पडली आहेत. दूषित दूध आणि पाळीव प्राण्यांचे न शिजवलेले अन्न खाल्ल्याने मांजरींचा मृत्यू झाला होता.

हा विषाणू बहुतेकदा गाईंच्या कासेमध्ये आढळतो. याचा अर्थ असा की, संक्रमित गाईंच्या कच्च्या, पाश्चराइज्ड नसलेल्या



दुधात विषाणूचे प्रमाण जास्त असू शकते. असे सेंट ज्यूड चिल्ड्रन्स रिसर्च हॉस्पिटलमधील विषाणूशास्त्रज्ञ आणि इन्फ्लूएंझा तज्ज्ञ स्टेसी एल. शुल्ट्झ-चेरी म्हणाल्या आहेत.

अंड्यांमध्ये विषाणू कमी प्रमाणात असू शकतो तरीही तुलनात्मक अभ्यासाशिवाय हे निश्चितपणे सांगणे कठीण आहे; परंतु तुम्ही ती कच्ची अंडी खाल्ली तरीसुद्धा अंड्याद्वारे बर्ड फ्लू होण्याची शक्यता अजूनही खूपच कमी आहे, असे मॅसॅच्युसेट्स ॲमहर्स्ट विद्यापीठातील अन्नशास्त्राचे सहयोगी प्राध्यापक मॅथ्यू मूर म्हणाले.

जर तुम्हाला जास्त काळजी घ्यायची असेल, तर पाश्चराइज्ड अंड्यातील द्रवरूप पांढरा भाग जो कार्टनमध्ये येतो, तो सेवनासाठी सुरक्षित मानला जातो. कारण- पाश्चराइज्ड प्रक्रियेमुळे अंड्यावरील विषाणू निष्क्रिय होतात.


अंडी पूर्णपणे शिजवल्याने वा उकडल्याने त्यावरील विषाणू नष्ट होतात. रोगनियंत्रण आणि प्रतिबंध केंद्राच्या शिफारशीनुसार, १६५ अंशांच्या अंतर्गत तापमानाला अंडी शिजवावीत म्हणजेच अंड्यातील पिवळा भाग शिजवल्यानंतर घट्ट झालेला असावा. तसेच स्क्रॅम्बल्ड अंडे पूर्णपणे शिजलेले असावे आणि ते द्रव किंवा पाण्याप्रमाणे कच्चे नसावे.

मुख्य गोष्ट अशी आहे की, जर योग्य पद्धतीने अन्न हाताळले जात असेल आणि शिफारशीप्रमाणे अंडी पूर्णपणे शिजवली वा उकडली जात असतील, तर धोका अत्यंत कमी आहे, असे जॉन्स हॉपकिन्स ब्लूमबर्ग स्कूल ऑफ पब्लिक हेल्थमधील पशुवैद्य व पर्यावरणीय साथीचे रोगतज्ज्ञ डॉ. मेघन डेव्हिस म्हणाल्या. अन्न हाताळताना सुरक्षित राहण्यासाठी तज्ज्ञ सल्ला देतात: १. कच्ची अंडी हाताळल्यानंतर आपले हात व्यवस्थित धुवा. २. कच्ची अंडी जेथे हाताळली गेली, तेथील स्वयंपाक करण्याचा पृष्ठभाग आणि भांडे साबणमिश्रित पाण्याने स्वच्छ करा. ३. फक्त बर्ड फ्लूचा धोका कमी करण्यासाठी नव्हे, तर अन्नातून होणारी संभाव्य विषबाधा टाळण्यासाठी कुकी किंवा केकसाठी वापरले जाणारे कच्चे पीठ चाखणे किंवा खाणे टाळा. कारण- त्यात साल्मोनेलासारखे हानिकारक जंतू असू शकतात.

लहान मुले, वृद्ध, गर्भवती महिला आणि रोगप्रतिकार शक्ती कमकुवत झालेल्या लोकांसारख्या असुरक्षित गटांसाठी ही खबरदारी घेणे विशेष महत्त्वाचे आहे.

## छातीमधील कफ कमी होत नाहीये? मग तुपासोबत करा ‘या’ मसाल्याचे सेवन, क्षणार्धात मिळेल आराम

हिवाळ्यामध्ये वातावरणात सतत काहींना काही बदल होत असतात. वातावरणात होणाऱ्या बदलांचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो. सर्दी, खोकला, ताप इत्यादी साथीचे आजार वाढू लागल्यानंतर शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमी होऊन जाते. सर्दी खोकल्याची समस्या वाढू लागल्यानंतर काहीवेळा डॉक्टरांच्या गोळ्या औषधांनी सुद्धा आराम मिळत नाही. अशावेळी घरगुती उपाय करून आराम मिळवण्याचा प्रयत्न करावा. घरगुती उपाय शरीरासाठी अधिक प्रभावी आहे. छातीमध्ये जमा झालेल्या कफामुळे छातीत दुखू लागल्यास स्वयंपाक घरातील मसाल्याचा वापर करा. लवंगचा चहा किंवा पाणी बनवून प्यायल्यास छातीमध्ये जमा झालेला कफ मोकळा होऊन, छातीमधील दुखण्यापासून आराम मिळेल.



लवंगमध्ये अनेक औषधी गुणधर्म आढळून येतात. या मसाल्याचा वापर प्रामुख्याने पुलाव किंवा तिखट पदार्थ बनवताना केला जातो. चवीला तिखट असलेली लवंग आरोग्यासाठी अतिशय प्रभावी आणि फायदेशीर आहे. लवंगचे नुसतेच सेवन न करता तुम्ही तुपासोबत लवंग खाल्यास सर्दी, खोकला कमी होऊन आराम मिळेल. लवंगामध्ये अँटी-बॅक्टेरियल आणि अँटी-इंफ्लेमेटरी गुणधर्म आढळून येतात, ज्यामुळे शरीराची कमी झालेली रोगप्रतिकारशक्ती सुधारण्यास मदत होते. चला तर जाणून घेऊया लवंग आणि तुपाचे एकत्र सेवन केल्यामुळे आरोग्याला होणारे फायदे.

खोकल्यासाठी लवंगचा वापर कसा करावा:

सर्दी किंवा खोकला वाढू लागल्यानंतर तूप गरम करून त्यात लवंग गरम करून खा. यामुळे छातीमध्ये जमा झालेला कफ कमी होऊन छातीच्या दुखण्यापासून आराम मिळेल. तूप खाणे आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. हिवाळ्यामध्ये तुपात शिजवलेला लवंग खाल्यामुळे आरोग्यासंबंधित समस्यांपासून आराम मिळतो. तुपात शिजवलेला किंवा भाजलेला लवंग आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे.

लवंगचे सेवन करावे:

सर्दी, खोकला आणि आरोग्यासंबंधित समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी तूप आणि लवंगचे सेवन करावे. यासाठी तूप गरम करून त्यात ५ ते ६ लवंग भाजून घ्या. त्यानंतर थंड करून तुम्ही लवंगाचे सेवन करू शकता. यामध्ये युजेनॉल नावाचा घटक आढळून येतो. ज्यामुळे छातीत जमा झालेला कफ पातळ होऊन बाहेर पडून जातो. याशिवाय तुम्ही लवंग तेलाचा सुद्धा वापरू करू शकता. लवंग तेलाचा वास घेतल्यामुळे छातीमध्ये जमा झालेला कफ मोकळा होतो.

तूप खाण्याचे फायदे:

सकाळी उठल्यानंतर उपाशी पोटी नियमित एक चमचा तुपाचे सेवन केल्यामुळे पचनक्रिया सुधारण्यास मदत होते. याशिवाय साथीच्या आजारांमुळे शरीराची कमी झालेली रोगप्रतिकारशक्ती वाढते. त्वचेवर आलेले मुरूम, फोड, सुरकुत्या दूर करण्यासाठी नियमित तुपाचे सेवन करावे. रोजच्या आहारात एक चमचा तूप खाल्यामुळे शरीर हायड्रेट राहते आणि आरोग्यासंबंधित समस्या दूर होतात.

## शेतकऱ्याप्रमाणे संध्याकाळी ७ वाजण्यापूर्वी जेवा, निरोगी राहण्यासाठी पंतप्रधान मोदींचा सल्ला, डॉक्टरांनी सांगितले फायदे

जर तुम्ही संध्याकाळी ७ वाजण्यापूर्वी जेवण केले आणि लवकर झोपला तर ते तुमच्या आरोग्यासाठी नक्कीच लाभदायी ठरू शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही ‘परीक्षा पे चर्चा २०२५’च्या पॉडकास्टमध्ये बोर्ड परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांना चांगल्या आरोग्यासाठी सूर्यास्तापूर्वी जेवणाचे फायदे सांगितले. एका शेतकऱ्याप्रमाणे, चांगल्या आरोग्यासाठी संध्याकाळी ५-६ वाजेपर्यंत जेवण करा. आजार नसणे म्हणजे आपण निरोगी आहोत असे नाही. झोप पोषणावरदेखील अवलंबून असते. वैद्यकीय शास्त्रदेखील झोपेवर लक्ष केंद्रित करते, असे मोदी म्हणाले. संशोधन काय सांगते? सोशल मीडियावर सध्या फिरत असलेल्या २०२३ च्या संशोधन अभ्यासानुसार, संध्याकाळी ७ वाजेपूर्वी जेवण केल्याने आयुष्यमान ३५ टक्क्यांनी वाढते. फ्रंटियर्स इन न्यूट्रिशनमध्ये प्रकाशित झालेला दुसरा अभ्यास, जो इटलीच्या ला’अक्विला प्रदेशात जिथे ९० आणि १०० वयोगटातील अनेक लोक राहतात यांच्यावर करण्यात आला होता. या अभ्यासात आढळून आले की, स्थानिक लोक त्यांच्या दीर्घायुष्याचे श्रेय दोन मुख्य सवयींना देतात; रात्रीचे जेवण लवकर करणे आणि कमी कॅलरीयुक्त आहाराचे पालन करणे. पोषण आणि झोपेमधील यांच्यामध्ये काय संबध आहे? सायंकाळी ७ पूर्वी कमी प्रमाणात आहार घेण्याचे मोठे फायदे आहेत याबाबत वाढत्या पुराव्यांचा हवाला देऊन, चांगल्या आरोग्यासाठी तज्ज्ञ संध्याकाळी ७ वाजण्यापूर्वी कमी जेवण करण्याचा सल्ला देतात. यामुळे पचन प्रक्रिया सुलभ होण्यास मदत होते. पोट फुगणे टाळले जाते आणि पोटाच्या आतील भागात होणारा त्रास कमी करण्यासदेखील मदत होते. हलके आणि मसालेदार नसलेले पदार्थ खा, असे मुंबईतील ग्लेनेगल्स हॉस्पिटल्सचे संचालक आणि वरिष्ठ सल्लागार गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी डॉ. मेघराज इंगळे म्हणाले. डॉ. इंगळे यांच्या मते, हे रक्तातील साखर नियंत्रण, कोलेस्ट्रॉलची पातळी आणि चयापचय सुधारण्यास मदत करते, ज्यामुळे वजन



कमी होण्यास आणि दीर्घकालीन आजारांचा धोका कमी होण्यास मदत होते. तुम्ही हळूहळू जेवा आणि अन्न चांगले चावून खा, यामुळे तुमच्या पचनसंस्थेवरील ताण कमी होण्यास मदत होईल. या खाण्याच्या पद्धतीचा अवलंब केल्याने तुमच्या आरोग्याला फायदा होऊ शकतो, असे डॉ. इंगळे म्हणाले. संध्याकाळी ७ वाजण्यापूर्वी जेवण केल्याने आयुष्यमान ३५ टक्के वाढते हे विधान वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेले नाही, परंतु पुण्यातील बाणेर येथील ज्युपिटर हॉस्पिटलच्या वरिष्ठ आहारतज्ज्ञ डॉ. स्वाती संधान सांगतात, संशोधनातून असे दिसून येते की लवकर जेवण आणि वेळेचे बंधन असलेले जेवण दीर्घायुष्यासाठी फायदेशीर ठरू शकते. संध्याकाळी लवकर जेवण केल्याने तुमच्या खाण्याच्या पद्धती तुमच्या शरीराच्या नैसर्गिक चक्रांशी जुळतात, ज्यामुळे हृदयरोग, उच्च रक्तदाब आणि चयापचय सिंड्रोमचा धोका कमी होतो, असे संधान सांगतात.

## दुपारच्या जेवणात चुकूनही करू नका ‘या’ पदार्थांचे सेवन, पोटासंबंधित समस्यांमध्ये होईल वाढ





शरीराची ऊर्जा वाढवण्यासाठी आणि आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी नियमित जेवण जेवणे आवश्यक आहे. यामुळे शरीराला अनेक फायदे होतात. दुपारच्या जेवणात शरीराला पचन होईल अशा पदार्थांचे सेवन करावे. दुपारच्या वेळी पोटभर जेवल्यामुळे शरीराला आवश्यक पोषक तत्वे मिळतात. त्यामुळे दुपारच्या जेवणात प्रामुख्याने शरीराला सहज पचन होतील अशाच पदार्थांचे सेवन करावे. दुपारच्या वेळी जेवलेले अन्नपदार्थ सहज पचतात. पण चुकीच्या पदार्थांचे सेवन केल्यास आरोग्याला हानी पोहचण्याची शक्यता असते. त्यामुळे अपचन, गॅस, पोट फुगणे, जडपणा किंवा थकवा येण्याची शक्यता असते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला दुपारच्या जेवणात कोणत्या पदार्थांचे सेवन करू नये, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया. दुपारच्या जेवणात कोणत्या पदार्थांचे सेवन करू नये:

तळलेले किंवा तेलकट पदार्थ:

दुपारच्या जेवणात तेलकट किंवा तळलेल्या पदार्थांचे अतिसेवन करू नये. यामुळे पोटासंबंधित समस्या उद्भवू शकतात. तेलकट पदार्थ पचनास अतिशय जड असतात. या पदार्थांच्या सेवनामुळे पचनक्रिया बिघडते. तेलकट पदार्थ खाल्यानंतर ते पचण्यास जड जातात. फास्टफूड, समोसे, भजी, तळलेले पराठे, कचोरी इत्यादी पदार्थांमध्ये जास्त प्रमाणात तेल असते. त्यामुळे शरीरात कोलेस्ट्रॉलची पातळी सहज वाढू शकते. दुपारच्या वेळी तेलकट किंवा तिखट पदार्थांचे सेवन केल्यास शरीरातील ऊर्जा वाढण्याऐवजी कमी होऊन जाते.

गोड पदार्थ किंवा मिठाई:

दुपारच्या जेवणात काहींना गोड पदार्थ खाण्याची सवय असते. मात्र नेहमी नेहमी गोड पदार्थांच्या अतिसेवनामुळे शरीरातील साखरेची पातळी वाढत जाते आणि आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. आहारामध्ये अतिप्रमाणात साखरेचे सेवन केल्यास मधुमेह वाढू शकतो. याशिवाय आहारात खाल्लेल्या गोड पदार्थांमुळे लाघवीमधील आमलपित्त वाढण्याची शक्यता असते. त्यामुळे दुपारच्या जेवणात साखरेचे गोड पदार्थ न खाता फळांचे सेवन करावे.

फळे आणि कच्च्या भाज्या:

दैनंदिन आहारात फळांचे सेवन करणे आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. पण दुपारच्या वेळी जेवणात अन्नपदार्थ खाल्यानंतर लगेच फळे खाऊ नयेत. यामुळे अन्नपदार्थ पचण्यास वेळ लागतात. फळे आणि जेवणातील पदार्थ एकत्र खाल्यामुळे शरीरात तात्काळ पचन होते, पण अन्नपदार्थ पचनास जास्तीचा वेळ लागतो. यामुळे गॅस, पोट फुगणे, अपचन इत्यादी समस्या उद्भवू लागतात.

गरम आणि थंड पदार्थांचे एकत्र सेवन:

दुपारच्या आहारात काहींना थंड आणि गरम पदार्थ एकत्र खाण्याची सवय असते. मात्र या दोन्ही पदार्थांचे एकत्र सेवन केल्यामुळे पचनक्रिया बिघडते. कोल्ड ड्रिंक्स, आईस्क्रीम किंवा थंड ताक जेवल्यानंतर लगेच प्यायल्यास पचनक्रिया बिघडते आणि पोट दुखीचा त्रास होण्यास सुरुवात होते. त्यामुळे अपचनाची समस्या उद्भवू लागल्यानंतर कोमट पाण्यात लिंबाचा रस टाकून प्यावे.

## चहाला द्या बिस्किटांची जोड! घरीच बनवा मार्केट स्टाइल चॉको चिप्स कुकीज, सोपी आहे रेसिपी

संध्याकाळ झाली की अनेकांना चहाची तलप येते. आता चहा म्हटला की त्यासोबत स्नॅक्स आलेच. चहासोबत खाण्यासाठी तसे तर अनेक पर्याय उपलब्ध आहेत जसे की, बिस्किटे, खारी, टोस मात्र आज आम्ही तुम्हाला सर्वांच्या आवडीच्या चॉको चिप्स कुकीजची रेसिपी सांगणार आहोत. ही रेसिपी फार सोपी असून अगदी निवडक साहित्यापासून बनवली जाते.

चॉको चिप्स कुकीज ही एक लोकप्रिय डिश आहे जी सर्व वयोगटातील लोकांना आवडते. ते बनवायला सोपे आणि खायला चविष्ट असतात. तुम्ही अनेकदा हे कुकीज विकत घेऊन खाल्ले असतील मात्र आम्ही तुम्हाला सांगतो की, हे कुकीज तुम्ही घरीदेखील अगदी सहज आणि सोप्या पद्धतीने तयार करू शकता. हे कुकीज एकदाच तयार केल्यास तुम्ही त्यांना अनेक महिने साठवून ठेवू शकता. जाणून घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.





साहित्य

- १ कप (२ काड्या) नसाल्ट केलेले लोणी, मऊ
- ३/४ कप दाणेदार साखर
- ३/४ कप ब्राऊन शुगर
- २ मोठी अंडी
- १ टीस्पून व्हॅनिला अर्क
- १/४ कप मैदा
- १ टीस्पून बेकिंग सोडा
- १/२ टीस्पून मीठ
- २ कप चोको चिप्स

कृती

यासाठी सर्वप्रथम ओव्हन ३७५ओऋ (१९०ओउ) वर प्रीहीट करा यानंतर एका मोठ्या वाडग्यात, क्रीम बटर, साखर आणि ब्राऊन साखर फेटून घ्या

मग यात अंडी आणि व्हॅनिला अर्क घाला आणि चांगले मिसळा

एका वेगळ्या वाडग्यात, मैदा, बेकिंग सोडा आणि मीठ मिसळा

ओल्या साहित्यांमध्ये कोरडे साहित्य घाला आणि चांगले एकत्र होईपर्यंत मिसळा

आता यात चोको चिप्स घाला आणि मिक्स करा

आता तयार मिश्रणाचे गोळे करून मग त्यांना कुकीजचा आकार द्या

१० - १२ मिनिटे किंवा ते सोनेरी तपकिरी होईपर्यंत हे कुकीज बेक करा

कुकीज ५ मिनिटे थंड होऊ द्या

तयार कुकीज एका डब्यात भरा आणि हवे तेव्हा खाण्यासाठी सर्व्ह करा

तुम्ही चहासोबत यांना सर्व्ह करू शकता

# कळंब येथे व्हाइस ऑफ मिडियाच्या वतीने जेष्ठ पत्रकार आणि कर्तृवान व्यक्तींचा सत्काराने सन्मानित




कळंब/प्रतिनिधी आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त बुधवार दिनांक १२ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंढे काँपलेक्स परळी रोड येथील सभागृहात व्हाइस ऑफ मिडियाच्या वतीने दर्पनदिन साजरा करण्यात आला कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे दिप प्रज्वलन करून पुजन करण्यात आले पत्रकार दिनाचे औचित्य साधून कळंब तालुक्यातील जेष्ठ पत्रकार आणि कर्तृवान व्यक्तींचा प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी सत्कारमूर्ती म्हणून जेष्ठ पत्रकार म्हणून गणेश आण्णा शिंदे,माधव सिंग राजपूत, सुभाष घोडके,दिलिप झोरी, तुळशीराम चंदनशिवे तर शैक्षणिक क्षेत्रातील शरदचंद्र महाविद्यालय शिराढोण प्राचार्य डॉ.साजेद चाऊस आदर्श मुख्याध्यापक म्हणून राजेंद्र बिक्कड दंतरोग तज्ञ म्हणून डॉ.करिश्मा शेख यांचा शाल,पुणेरी टोपी,ट्रॉफि आणी गिफ्ट देऊन सत्कार करुन सन्मानित करण्यात आले यावेळी व्हाइस ऑफ मिडिया धाराशिव जिल्हा संघटकपदी दै.धाराशिव नामाचे कळंब तालुका प्रतीनीधी रामराजे जगताप, धाराशिव जिल्हा उपाध्यक्षपदी दिपक बारकुल यांची निवड झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करुन सन्मानित करण्यात आले तर मराठी पत्रकार संघाचे येरमाळा अध्यक्ष लहु बारकुल यांच्यासह त्यांच्या टिम सत्कार करुन सन्मानित करण्यात आले व येरमाळा येथील....... सेवाभावी समाजीक संस्थेने व्यायाम शाळा आणि येरमाळा येथील पत्रकार भवनासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून घेतल्याबद्दल दिपक बारकुल व त्यांच्या टिम सत्कार करुन सन्मानित करण्यात आले आहे तसेच हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केला त्यामुळे व्हाइस ऑफ मिडिया कळंब शाखेच्या वतीने व्हाइस ऑफ मिडिया महाराष्ट्र राज्य कार्यवाह अमर चोंदे यांचाही मान्यवरांच्या हस्ते सत्कार करुन सन्मानित करण्यात आले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कॅनव्हास इंटरनॅशनल स्मार्ट इंग्लिश स्कूलचे संचालक रवि नरहिरे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून पर्याय संस्थेचे सचिव विश्वनाथ आण्णा तोडकर आणि उद्घघाटक म्हणून व्हाइस ऑफ मिडियाचे आहिल्या नगर जिल्हाध्यक्ष गोरक्षनाथ मदने उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कळंब सहाय्यक पोलीस निरीक्षक मा. .........,व्हाईस ऑफ मिडिया महाराष्ट्र राज्य कार्यवाह अमर चोंदे, व्हाइस ऑफ मिडिया अहिल्या नगर(द) जिल्हाध्यक्ष गणेश खविटकर,जेष्ठ पत्रकार ज्ञानेश्वर पतंगे, बालाजी बप्पा आडसुळ, परमेश्वर पालकर,शितल कुमार धोंगडे, महादेव महाराज आडसुळ उपस्थित होते यावेळी प्रमुख मार्गदर्शक विश्वनाथ आण्णा तोडकर यांनी उपस्थीतांना शानदार असे मोलाचे मार्गदर्शन केले तसेच रवि नरहिरे, गोरक्षनाथ मदने, गणेश कविटकर, महादेव महाराज आडसुळ यांनी मोलाचे मार्गदर्शन केले यावेळी व्हाईस ऑफ मिडिया धाराशिव जिल्हा संघटक रामराजे जगताप, जिल्हा उपाध्यक्ष दिपक बारकुल, तालुका उपाध्यक्ष शिवप्रसाद बियाणी, कार्याध्यक्ष रामरतन कांबळे, कोषाध्यक्ष सतीश तवले,सरचिटणीस अविनाश सावंत,तालुका डिजिटल विंगचे तालुका अध्यक्ष अमोल रणदिवे,कार्याध्यक्ष सलमान मुल्ला, साप्ताहिक विंगचे तालुकाध्यक्ष राजाभाऊ बारगुले,अतुल मडके,दादा खतीब,हाणूमंत पाटुळे,राहुल गाडे, अनिल गाडे,व तालुक्यातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व व्हाईस ऑफ मिडिया तालुका शाखेच्या सर्व पदाधिकारी आणि सदस्य यांनी परिश्रम घेतले प्रस्तावित रामरतन कांबळे यांनी केले तर सुत्रसंचलन ह.भ.प.जोशी सर तर आभार दादा खतीब यांनी मानले.

# कॉपीमुक्तीचा 'नरवाडे' पॅटर्न महाराष्ट्रभर जाणार!

शिराळा : प्रतिनिधी येथील २०२२ च्या बॅचचे आयएएस अधिकारी विशाल नरवाडे हे प्रशिक्षणार्थी तहसीलदार पदाचे काम पाहताना त्यांनी शून्य रुपये खर्चात पहिल्यांदाच कॉपी मुक्त अभियानचा 'विशाल नरवाडे' पॅटर्न परिक्षा केंद्रावर राबविला होता. याची दखल घेऊन मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बैठक झाली. यात यावर्षी कॉपीमुक्त परीक्षेसाठी 'विशाल नरवाडे' पॅटर्न राज्यभर राबविण्याचे आदेश दिले आहेत. गतवर्षी विशाल नरवाडे बुलढाणा येथेही जिल्ह्यात प्रथमच जिल्हा प्रशासनाने बारावी आणि दहावीच्या बोर्ड परीक्षेसाठी अभिनव कॉपीमुक्ती अभियान राबवले होते. याची दखल घेऊन महाराष्ट्रामध्ये कॉपी मुक्त अभियानचा 'विशाल नरवाडे' पॅटर्न राज्यभर राबविण्याचा आदेश मुख्य सचिवांनी दिला आहे. १० वी व १२ वीच्या बोर्डाच्या परीक्षा मार्चपर्यंत राज्यभर चालणार आहेत. परीक्षा एक महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी असल्याने सर्व विभागांचे इतके मनुष्यबळ उपलब्ध करून देणे प्रशासनासाठी आव्हानात्मक बनले आहे. झिरो बजेट पॅटर्न या मॉडेलमध्ये झूम तंत्रज्ञानाचा प्लॅटफॉर्म ऑडिओ-व्हिडिओ मोडमध्ये वापरला जातो. जिल्हा स्तरावर, केंद्रीकृत झूम बैठक तयार केली जाते. लिंकद्वारे प्रत्येक पर्यवेक्षकाकडून त्यांच्या मोबाईलवरून कॅमेरा चालू ठेवला जातो. उत्तरपत्रिका लिहिणा-या विद्यार्थ्यांना कोणताही त्रास होऊ नये म्हणून मोबाईल सायलेंट आणि म्यूट ठेवण्यात येतात. या मोबाईलद्वारे परीक्षा लिहिणारे सर्व विद्यार्थी दिसावेत. अशा प्रकारे सर्व परीक्षा केंद्रे आणि सर्व परीक्षा केंद्रांमधील सर्व ब्लॉक, वर्ग लाइव्ह व्हिडिओ रेकॉर्डिंग मोडमध्ये कव्हर केले जातात. परीक्षे-संदर्भात कोणीही कॉपी करतांना आढळल्यास, जिल्हास्तरीय होस्ट अनम्यूट करतात आणि संपूर्ण जिल्ह्याला ऐकू येतील अशा सूचना देतात. राज्यात आणि कदाचित देशात पहिल्यांदाच, कोणत्याही प्रशासकीय कार्यालयाकडून राज्य मंडळाच्या परीक्षेचे पर्यवेक्षन करण्यासाठी तंत्रज्ञानाचा इतका साधा, नाविन्यपूर्ण वापर केला गेला नसावा.

# आचरण चांगले तोच वारकरी संप्रदायाचा तात्विक अधिकारी...हभप बाळू महाराज गिरगावकर



केज/प्रतिनिधी हएखाद्या वेळी महाराजांच्या पाया पडू नका परंतु वारकऱ्यांच्या पाया जरूर पडा कारण वारकरी हा सर्वात पवित्र आहे. ज्याचे आचरण चांगले तोच वारकरी संप्रदायाचा तात्विक अधिकारी आहे असे विचार हभप बाळू महाराज गिरगावकर यांनी केज तालुक्यातील वरपगाव येथील वै. महंत रामकृष्ण महाराज यांच्या स्मृती सप्ताह निमित्त चौथ्या दिवसाच्या कीर्तन सेवेत व्यक्त केले. केज तालुक्यातील वरपगाव येथील शिवरामपुरी मठसंस्थानाला साडे तीनशे वर्षाची प्रबोधनाची परंपरा आहे. या पूर्वी नागेशपुरी महाराज व त्यानंतर रामकृष्ण महाराजांनी या मठ संस्थांनाअंतर्गत वरपगाव व पंचक्रोशी सह दूरदूर पर्यंत समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्यानंतर त्यांचे उत्तराधिकारी म्हणून भगवान महाराज शास्त्री या मठ संस्थानाचे कार्य करत आहेत. दरवर्षी मठसंस्थान सप्ताहाचे आयोजन करत असते. यावर्षीही सप्ताहात अनेक नामवंत कीर्तनकारांची सेवा पार पडत आहे. बुधवारी रात्री हभप बाळू महाराज गिरगावकर यांनी संत निळोबा महाराज यांच्या अभंगावर आपले कीर्तन केले. यावेळी त्यांनी उपस्थित भक्तांच्या आचरणात सत्य आचरण असावे. युवकांनी परिश्रम करावे असे आवाहन केले. कीर्तन हे मनोरंजन म्हणून ऐकू नका किर्तनातील विचारांचा समाज परिवर्तन होण्यासाठी वापर व्हावा अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. आपल्या स्पष्ट विचारासाठी परिचित असणाऱ्या गिरगावकर महाराजांनी प्रयत्न करणारा व्यक्ती आयुष्यात कधीच अयशस्वी होत नसल्याचे सांगून आईवडील ईश्वराचा अंश असून प्रत्येकाने आपल्या आई वडिलांची सेवा करावी असे आवाहन केले. यावेळी वरपगावचे मठाधिपती भगवान महाराज शास्त्री, केज पंचायत समितीचे माजी सभापती राजेसाहेब देशमुख, ड. लक्ष्मणराव भोसले, प्राचार्य आबासाहेब देशमुख, डॉ.टी.एल.देशमुख यांच्या सह हजारो भाविक उपस्थित होते.

# किनवट मतदार संघातील विजेसंबंधी सोयी-सुविधासाठी एनएससी योजनेतून निधी द्यावा आ. भीमराव केराम यांचे मुख्यमंत्री फडणवीसना पत्र



किनवट:शेख शौकत :-किनवट माहूर तालुक्यातील विजेच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी विजेसंबंधी पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याच्यादृष्टीने एनएससी( न्यू सर्व्हिस कनेक्शन )योजनेअंतर्गत ५०० लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी किनवट माहूर विधानसभेचे आमदार भीमराव केराम यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्र देऊन केली आहे. आमदार केराम यांनी पत्रात नमूद केले की किनवट विधानसभा मतदारसंघातील किनवट व माहूर हे तालुके भौगोलिक दृष्ट्या विस्ताराने मोठे आहेत. येथील बहुतांश जनता ही खेड्यापाड्यात व डोंगराळ भागात वास्तव्यास आहे. वाढती लोकसंख्या आणि विजेचा वापर लक्षात घेता दोन्ही तालुक्यात अपुऱ्या विद्युत सोयी-सुविधेमुळे वारंवार वीज पुरवठा खंडित होण्याच्या प्रमाणात लक्षणीय वाढ झाली आहे तर बहुतांश ठिकाणी कमी दाबाने वीज पुरवठा होत असल्यामुळे तांत्रिक बिघाडी निर्माण होऊन तासंतास विज गुल होत आहे. सद्यस्थितीत बहुतेक गावामध्ये उपलब्ध रोहित्रावरील भार शिल्लक नसल्यामुळे नवीन वीजजोडणी देणे करिता देखील अडचणी येत आहेत शेतकऱ्यांच्या शेतीपंपांना मुबलक प्रमाणात व सुरळीत वीजपुरवठा होत नसल्यामुळे रब्बी व उन्हाळी पिके घेणे शेतकऱ्यांना अवघड बनले आहे. किनवट व माहूर या दोन्ही तालुक्यातून वीजपुरवठा संबंधाने सातत्याने वारंवार तक्रारी येत असल्यामुळे माझ्या मतदारसंघातील किनवट व माहूर या दोन्ही तालुक्यातील विजेच्या समस्यांचे निराकरण करण्याकरिता तसेच अतिरिक्त रोहित उभारणी करणे, वाडीवस्तीमध्ये नवीन रोहित्र लघुदाब वाहिनी उभारणी करणे करिता एनएससी ( नवीन सेवा जोडणी)योजनेअंतर्गत ५०० लक्ष रुपये निधी मंजूर करून तात्काळ निधीचे वितरण करावे अशी मागणी आमदार भीमराव केराम यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्रातून केली आहे.


# संतोष देशमुखांच्या पत्नीला रमेशराव आडसकरांनी दिले नोकरीच नियुक्ती पत्र विशेष बाब म्हणून शासनाने दिली पद भरतीस मान्यता



केज :- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांना आडस ता. केज येथील श्री. छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था संचलित छत्रपती शिवाजी विद्यालयात कनिष्ठ लिपिक पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. शासनाने विशेष बाब म्हणून त्यांच्या या पद भरतीस मान्यता दिली असून संस्थेचे सचिव रमेश आडसकर व राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश्वर चव्हाण यांनी मस्साजोग येथे जाऊन त्यांना नियुक्तीपत्र सुपूर्द केले.

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडा नंतर त्यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांना शासकीय सेवेत सामावून घ्यावे. अशी ग्रामस्थांची आणि विविध स्तरातून मागणी केली होती. त्या नुसार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिक्षण संस्थेतील नोकरी बंद असल्याने विशेष बाब म्हणून पद भरतीसाठी मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देऊन देशमुख यांच्या पत्नी अश्विनी देशमुख यांना छत्रपती.शिक्षण संस्था आडस संचलित श्री. छत्रपती शिवाजी विद्यालयात कनिष्ठ विद्यालय आडस येथे लिपिक पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. त्यांना सुरुवातीचे तीन वर्षे परिविक्षाधीन कालावधीसाठी त्यांना प्रती महिना १० हजार रु. मानधन देण्यात येणार असून त्या नंतर मूळ वेतनश्रेणी दिली जाणार आहे. शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी रोजी श्री. छत्रपती शिक्षण संस्थेचे सचिव रमेश आडसकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे राजेश्वर चव्हाण यांनी मस्साजोग येथे जाऊन अश्विनी देशमुख यांना नियुक्तीपत्र सुपूर्द केले. यावेळी रमेशराव आडसकर, राजेश्वर देशमुख आणि देशमुख यांच्या मातोश्री शारदाताई देशमुख, भाऊ धनंजय देशमुख, माजी उपसभापती ऋषिकेश आडसकर, केजचे उपनगराध्यक्ष पशुपतीनाथ दांगट, दिलीप गुळभिले, चिंचोली माळीचे सरपंच सुनील देशमुख, साळेगावचे सरपंच कैलास जाधव, सारणी (आ.) चे सरपंच संतोष सोनवणे, रंजित आडसकर हे उपस्थित होते. मदितीचा धनादेश :- या वेळी रमेश आडसकर यांनी देशमुख कुटुंबीयांना नोकरीच्या नियुक्ती पत्रा सोबतच ५ लाख ५५ हजार रु. चा मदतीचा धनादेश देखील सुपूर्त केला.

# 'इन्फोसिस'मधील कर्मचारी कपातीची केंद्राकडून दखल



नवी दिल्ली : वृत्तसंस्था आठवड्यात ७० तास काम करण्याचा सल्ला देणारे नारायण मूर्ती यांची इन्फोसिस कंपनी पुन्हा एकदा वादात सापडली आहे. अलीकडेच कंपनीने ३०० हून अधिक प्रशिक्षणार्थी कर्मचा-यांना नोकरीवरुन काढून टाकण्याचा निर्णय घेतला. 'इन्फोसिस'ने कोणतेही ठोस कारण नसताना फ्रेशर्सना छाटणीच्या नावाखाली कामावरुन काढून टाकल्याचा दावा कर्मचा-यांनी केला आहे. दरम्यान, कंपनीच्या या निर्णयाची दखल आता राज्य आणि केंद्र सरकारने घेतली आहे.

दिग्गज आयटी कंपनी 'इन्फोसिस'ने ज्या कर्मचा-यांना नारळ दिला. त्यांनी आयटी कर्मचारी संघटना नॅसेंट इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी एम्प्लॉईज सिनेटकडे तक्रार केली आहे. त्यानंतर हे प्रकरण केंद्र सरकारपर्यंत पोहोचले. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून केंद्र सरकारने कर्नाटक राज्य सरकारला चौकशीचे आदेश दिले आहेत. इन्फोसिसने ३०० नाही तर ७०० फ्रेशर्सना काढून टाकल्याचा दावा कामगार संघटनेने केला आहे. तसेच, नॅसेंट इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी एम्प्लॉईज सिनेटनुसार, इन्फोसिसने अंतर्गत ॲसेसमेंट टेस्ट कर्मचारी उत्तीर्ण झाले नसल्याचे प्रमुख कारण सांगण्यात आले आहे. यासोबतच, इन्फोसिसने दबाव टाकून गोपनीय करारांवर स्वाक्षरी करण्यास भाग पाडल्याचेही नॅसेंट इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी एम्प्लॉईज सिनेटने म्हटले आहे.

# जीवन शिक्षण विज्ञान महाविद्यालय, केज येथे विद्यार्थ्यांसाठी फायनान्शिअल ट्रेनिंगचे यशस्वी आयोजन विद्यार्थ्यांनी केंद्रशासनाच्या सेबी अंतर्गत राबविलेल्या कार्यक्रमास दिला उत्स्फूर्त प्रतिसाद



केज /प्रतिनिधी :- दिनांक १४ फेब्रुवारी २०२५ रोजी जीवन शिक्षण विज्ञान महाविद्यालय, केज या ठिकाणी केंद्रशासनाच्या भारतीय प्रतिभूती आणि विनिमय ( डएइख) बोर्ड अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी आर्थिक नियोजन व विनिमय प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे सचिव मा. हारुण इनामदार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या सुरुवातीस पुलवामा हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना दोन मिनिट शांतता बाळगून श्रद्धांजली देऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून गणेश चौधरी सर ( सेबी - सिक्युरिटीज मार्केट ट्रेनर) लाभले. त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे फायदे, तरतुदी, आर्थिक बाबींचा विनिमय आणि आर्थिक गुंतवणूक करण्याच्या पद्धती यांवर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना खूप चांगल्या पद्धतीने मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी बदलत्या काळात आणि या स्पर्धेच्या युगात आर्थिक धोरणांवर काम करून स्वतः आर्थिक बाजूने कसे भक्कम उभे रहावे यावर त्यांनी भर दिला. आर्थिक गुंतवणूक करताना काय काळजी घ्यावी, शासकीय तरतुदींचा अभ्यास करून त्यावर कसे काम करावे जेणेकरून आपण आर्थिक बाजूने कसे प्रबळ होऊ, याबद्दल त्यांनी आपल्या शिबिरात मार्गदर्शन केले. या शिबिरास अध्यक्ष म्हणून संस्थेचे सचिव हारूण इनामदार, प्रमुख अतिथी नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड,संस्थेचे सहसचिव यासीन इनामदार उपस्थित होते.जीवन शिक्षण विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य मा.दत्तात्रय हांडीबाग सर,जीवन शिक्षण शैक्षणिक संकुलाचे प्रशासकीय अधिकारी तथा बंसल क्लासेस केज व कळंब शाखेचे सहसंचालक गोविंद ठोंबरे सर, जीवन शिक्षण प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक रमाकांत ढाकणे सर यांनी कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती लावली. बी.एस.सी.विभाग प्रमुख नितीन साखरे सर,बाळासाहेब बोधवड सर,दत्ता ठोंबरे सरयांनीकार्यक्रमाचे आयोजन व नियोजन व्यवस्थितरित्या पारपाडण्यास परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तथा आभार नितीन साखरे सर यांनी केले. जीवन शिक्षण विज्ञान महाविद्यालय, केजची आदर्श विद्यार्थिनी प्रेरणा थोरात हिचा मान्यवरांच्या हस्ते याप्रसंगी सत्कार देखील करण्यात आला.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE